**नि.फौ.ख.क्र.३७/२०२५**
**निशाणी क्र.१५.**

सरकार तर्फे **साक्षीदार क्रमांक.** ०१.

देवाशपथ खरे सांगतो की,

नावः– दादाराम विठ्ठल शेंडे.

वयः– ४७ वर्षे, व्यवसायः– कंत्राटदार .

रा. निमगांव केतकी, इंदापूर , ता. इंदापूर, जि.पुणे.

<u>सरतपास सरकारतर्फे सरकारी वकिल श्री एम.डी.करे यांच्यामार्फत सुरु :–</u>

०१. आरोपी चंद्रकांत शेंडे माझ्या भावकितील आहे. दि.०८/०२/२०२१ रोजी आरोपीने मला तीन अपत्य असल्याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार दिली होती. त्यावेळी मी ग्रामपंचायत सदस्य होतो. त्यानंतर मी सदर प्रकरणात जिल्हाधिकारी यांच्यासमोर हजर राहत होतो. त्यावेळी आरोपी मला वारंवार केस मागे घेतो पैसे दे अशी मागणी करु लागला व मला धमकी देवू लागला. आरोपीने माझ्याकडे पाच लाख रुपयांची मागणी केली. मी आरोपीला पैसे देण्यास नकार दिला. मात्र त्यानंतरही आरोपीने वारंवार मला व माझ्या कुटूंबीयांना जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे भितीपोटी मी घरच्याशी चर्चा करुन आरोपीच्या बँक आफ महाराष्ट्र शाखा निमगांव केतकीमध्ये माझ्या विश्वकर्मा कन्स्टक्शनच्या एच.डी.एफ.सी.बँकेच्या खात्यावरुन रक्कम रुपये अडीच लाख पाठविले.

०२. त्यानंतर मी माझ्या मुलीचा विवाह ठरवित होतो. त्यावेळी आरोपी मला मुलीचा विवाह कसा करतो असे म्हणून वेळोवेळी धमकी देवू लागला. तसेच आरोपी माझ्या कुटूबियांची बदनामी करु लागला व मुलीचे लग्न होवू देणार नाही अशी धमकी देवू लागला. त्यांनतर पुन्हा भितीपोटी मी दोन साक्षीदारांसमक्ष आरोपीला दोन लाख रुपये रोख आरोपीच्या घरी जावून दिले. त्या साक्षीदारांची नावे संतोष रामदास हेगडे व राजकुमार शेंडे आहेत. त्यानंतर जिल्हाधिकारी यांच्यासमोरील तक्रार पाठीमागे घेण्याकरीता मी पुन्हा पन्नास हजार रुपये आरोपीच्या खात्यावर पाठविले. त्यानंतर आरोपीने तक्रार मागे घेतली नाही. याउलट आरोपी मला वमाझ्या कंत्राटदार भाऊ दत्तात्रय शेंडे यास व्यवसाय करु देणार नाही अशी धमकी देवून पैशांची मागणी करु लागला. आरोपी वारंवार धमकी देवू लागल्याने मी पोलीस ठाण्यात जावून आरोपीविरुध्द तक्रार दिली.

०३. आता मला सदरची फिर्याद दाखविली. ती तीच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. फिर्यादला **निशाणी १६** देण्यात येते. आता मला प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी १७** देण्यात येते. आजरोजी न्यायालयात आरोपी हजर आहे.

०४. माझा न्यायालयात कलम १६४ अन्वये जबाब नोदंविण्यात आला होता. सदर जबाबाची सिल असलेले पाकिट उघडण्यात आले. त्यामध्ये तीन साक्षीदारांचा जबाब आहे. त्यापैकी माझा जबाब दाखविण्यात आला. तो तोच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी १८** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री एन जी शहा यांच्यामार्फतः–</u>**

अर्ज **निशाणी १४** वरील आदेशानुसार उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

<u>उलटतपास–पुर्ण.</u>
<u>फेरतपास–नाही.</u>

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT

Digitally signed by BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Date: 2026.01.31 13:43:29 +0530

दिनांकः३१/०१/२०२६ (प्र.चं.बारटक्के)
ठिकाण – इंदापूर. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.